Exh.25

नेवासा येथिल मे. सिव्हिल जज साहेब ज्यु.डी
यांचे कोर्टात

रे.मु.नं.
209/25

वादी
अनिल हेमराज

प्र.वादी
धनराज जसराज




याकामी वादीतर्फे विनंती अर्ज की,

सदर दाव्यात मा. कोर्टाने 9/9/2025 अशी तारीख दिली आहे सदर वादी यांना सदर दाव्यात अर्जन्सी व काही महत्वाचे हुकुम घेणे आहे सबब मे. साहेबांस नम्र विनंती की, सदर दाव्यात जवळची तारीख द्यावी ही विनंती

नेवासा
दिनांक - 17/7/25

वादीतर्फे ॲडव्होकेट
(Adv N.S. Joshi)

Order
---------------------------
Granted

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.07.17 17:53:08 +0530

2nd Jt.CJJD Newasa

Exh.24

नेवासा येथील मे.सिव्हील जज्ज साहेब (ज्यु.डि)
यांचे कोर्टात

शे.मु.नं
२०८ /२०२५

ने.ता. ८|८|२०२५

वादी / धनको
अनिल हेमराज भळगट
प्रतिवादी / ऋणको
धनराज जयराज




याकामी वादी / धनको तर्फे विनंती अर्ज की,

नंबर मजकूरचा दावा आजरोजी मा.कोर्टाचे बोर्डावर नाही परंतु सदर दाव्यातील वादी यास सदर दाव्यात काही महत्वाचे हुकूम घेणे गरजेचे व आवश्यक आहे.

सबब मा.कोर्टास नम्र विनंती की,

सदरचा दावा आजरोजी मा.कोर्टाचे बोर्डावर घेण्याचा हुकूम व्हावा ही विनंती.

तरी अर्ज मंजुर व्हावा ही विनंती.

नेवासा

दिनांक ~~१३/०३/२०२५~~
१७/०७/२०२५

ॲडव्होकेट
(Adv N.S. Joshi)

Order
---------------------------
Granted

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.07.17 17:53:15 +0530

2nd Jt.CJJD Newasa

Exh.26

# नेवासा येथील मे. सिव्हील जज्ज साहेब ज्यु.डी.

## यांचे कोर्टात

**रे.मु.नं.**

**209/2025**

**वादी**

अनिल हेमराज

**प्रतिवादी**

धनराज जसराज वगैरे



**या कामी वादी तर्फे सि.पी.सी. ऑर्डर 6 रुल 17 प्रमाणे दुरुस्तीचा अर्ज असे तो खालीलप्रमाणे.**

सदरचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द जाहिर ठरावासाठी व निरंतर ताकिद मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे.

सदर दाव्यातील प्रतिवादी नं.2 व 3 हे हजर होऊन त्यांनी कैफियत व सी.पी.सी. ऑर्डर 7 रुल 11 चा अर्ज दाखल केला आहे.

सदर दाव्यात प्रतिवादी यांनी सदरचा दावा चालू असतांना दावा कलम 1ब चे नुकतेच म्हणजेच दिनांक 16/06/2025 रोजी हस्तांतरण केले असुन खरेदी घेणार प्रतिवादी नं.1 व भाग्यश्री किरण भंडारी यांना हस्तांतर केले असल्याने सदर दाव्यात खालीलप्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

सदर दाव्यात नि.नं. 1 वर प्रतिवादी नं.4 नंतर नविन प्रतिवादी नं.5 म्हणुन खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

"प्रतिवादी नं.5 भाग्यश्री किरण भंडारी, वय-48 धंदा घरकाम रा.बंगलो नं.21, पार्श्वनाथ को-ऑफ हौसिंग सोसायटी, नाशिक फाटा जवळ, कासारवाडी पुणे-411034"

Order

---------------------------

Issue notice to def. & proposed def.

SANDHYA YUVRAJ SUL

Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.07.17 17:53:20 +0530

2nd Jt.CJJD Newasa

तसेच दावा 7 च्या खाली नविन 7अ म्हणुन खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

“ 7अ) सदरचा दावा चालू असतांना प्रतिवादी नं.2 व 3 यांनी दावा कलम 1ब ही मिळकत प्रतिवादी नं.1 व प्रतिवादी नं.5 यांना तारीख 16/06/2025 रोजी दस्त क्रमांक 4010/2025 नुसार बेकायदेशीर हस्तांतर केले असुन सदरचे हस्तांतर हे वादीवर बंधनकारक राहु नये यासाठीही सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे.”

तसेच दावा कलम पॅरा 13 मध्ये विनंती कलम अ च्या खाली नविन अअ म्हणुन खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

“ अअ) दावा कलम 1ब या मिळकतीचे प्रतिवादी नं.2 व 3 यांनी प्रतिवादी नं.1 व 5 यांना तारीख 16/06/2025 रोजी दस्त क्रमांक 4010/2025 हे वादीवर बंधनकारक राहु नये असा जाहिर ठराव मा.कोर्टाने करावा.”

तसेच दावा कलम पॅरा 13 मध्ये विनंती कलम अअ च्या खाली नविन अअअ म्हणुन खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

“ अअअ) सदर दाव्यातील प्रतिवादी नं.1 व 5 यांनी दावा कलम 1अ च्या कब्जेवहिवाटीस बेकायदेशीर हरकत करु नये व दावा कलम 1ब चे कोणासही कोणत्याही प्रकारे हस्तांतर करु नये असा निरंतर ताकिद मनाई हुकुम प्रतिवादी नं.1 व 5 विरुध्द देववावा.”

वर नमुद केलेप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करणेसाठी सदरचा अर्ज दिलेला आहे. सदरच्या अर्जात वादींनी कोणतिही नविन माहिती घातलेली नाही अगर प्रतिवादींना आश्चर्यकारक अशी केस निर्माण होत नाही. दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. सदरची दुरुस्ती ही नैसर्गिक व प्रासंगिक आहे त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने सदरची दुरुस्ती करणे अत्यावश्यक झालेले आहे. सदरची दुरुस्ती ही

प्रतिवादींनी केलेल्या बेकायदेशीर हस्तांतरणाचे व्यवहारामुळे करणे गरजेचे व आवश्यक झालेले आहे.

तरी मे.कोर्ट साहेबांना नम्र विनंती की, वादीचा सदरचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजुर करण्यात यावा. वर नमुद केलेप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी. तरी अर्ज मंजुर व्हावा हि नम्र विनंती. सोबत ॲफिडेव्हिट दिले आहे.

**नेवासा**

**दिनांक:- 15 /07/2025** **वादी**

**वादी तर्फे ॲडव्होकेट**

Exh.27

# नेवासा येथील मे. सिव्हील जज्ज साहेब ज्यु.डी.

# यांचे कोर्टात

**रे.मु.नं.**

**209/2025**

**वादी**

अनिल हेमराज

**प्रतिवादी**

धनराज जसराज वगैरे

**या कामी मी अनिल हेमराज भळगट वय-65 धंदा शेती रा.सोनई ता.नेवासा जि.अ.नगर सत्यप्रतिज्ञेवर ॲफिडेव्हिट करतो की,**

सदरचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द जाहिर ठरावासाठी व निरंतर ताकिद मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे.

सदर दाव्यातील प्रतिवादी नं.2 व 3 हे हजर होऊन त्यांनी कैफियत व सी.पी.सी. ऑर्डर 7 रुल 11 चा अर्ज दाखल केला आहे.

सदर दाव्यात प्रतिवादी यांनी सदरचा दावा चालू असतांना दावा कलम 1ब चे नुकतेच म्हणजेच दिनांक 16/06/2025 रोजी हस्तांतरण केले असुन खरेदी घेणार प्रतिवादी नं.1 व भाग्यश्री किरण भंडारी यांना हस्तांतर केले असल्याने सदर दाव्यात खालीलप्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

सदर दाव्यात नि.नं. 1 वर प्रतिवादी नं.4 नंतर नविन प्रतिवादी नं.5 म्हणुन खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

"प्रतिवादी नं.5 भाग्यश्री किरण भंडारी, वय-48 धंदा घरकाम रा.बंगलो नं.21, पार्श्वनाथ को-ऑफ हौसिंग सोसायटी, नाशिक फाटा जवळ, कासारवाडी पुणे-411034"

Order
--------------------------
Seen & filed

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.07.17 17:53:27 +0530

2nd Jt.CJJD Newasa

सहा.अधीक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर
नेवासा

तसेच दावा 7 च्या खाली नविन 7अ म्हणुन खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

" 7अ) सदरचा दावा चालू असतांना प्रतिवादी नं.2 व 3 यांनी दावा कलम 1ब ही मिळकत प्रतिवादी नं.1 व प्रतिवादी नं.5 यांना तारीख 16/06/2025 रोजी दस्त क्रमांक 4010/2025 नुसार बेकायदेशीर हस्तांतर केले असुन सदरचे हस्तांतर हे वादीवर बंधनकारक राहु नये यासाठीही सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे."

तसेच दावा कलम पॅरा 13 मध्ये विनंती कलम अ च्या खाली नविन अअ म्हणुन खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

" अअ) दावा कलम 1ब या मिळकतीचे प्रतिवादी नं.2 व 3 यांनी प्रतिवादी नं.1 व 5 यांना तारीख 16/06/2025 रोजी दस्त क्रमांक 4010/2025 हे वादीवर बंधनकारक राहु नये असा जाहिर ठराव मा.कोर्टाने करावा."

तसेच दावा कलम पॅरा 13 मध्ये विनंती कलम अअ च्या खाली नविन अअअ म्हणुन खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

" अअअ) सदर दाव्यातील प्रतिवादी नं.1 व 5 यांनी दावा कलम 1अ च्या कब्जेवहिवाटीस बेकायदेशीर हरकत करु नये व दावा कलम 1ब चे कोणासही कोणत्याही प्रकारे हस्तांतर करु नये असा निरंतर ताकिद मनाई हुकुम प्रतिवादी नं.1 व 5 विरुध्द देववावा."

वर नमुद केलेप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करणेसाठी सदरचा अर्ज दिलेला आहे. सदरच्या अर्जात वादींनी कोणतिही नविन माहिती घातलेली नाही अगर प्रतिवादींना आश्चर्यकारक अशी केस निर्माण होत नाही. दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. सदरची दुरुस्ती ही नैसर्गिक व प्रासंगिक आहे त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने सदरची दुरुस्ती करणे अत्यावश्यक झालेले आहे. सदरची दुरुस्ती ही

प्रतिवादींनी केलेल्या बेकायदेशीर हस्तांतरणाचे व्यवहारामुळे करणे गरजेचे व आवश्यक झालेले आहे.

तरी मे.कोर्ट साहेबांना नम्र विनंती की, वादीचा सदरचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजुर करण्यात यावा. वर नमुद केलेप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी. तरी अर्ज मंजुर व्हावा हि नम्र विनंती. सोबत ॲफिडेव्हिट दिले आहे.

**येणेप्रमाणे ॲफिडेव्हिट दिले असे.**

**नेवासा**

**दिनांक:- 15 /07/2025** **ॲफिडेव्हिट करणार**

**ओळख**

( N. S Joshi )

या कामी मी अनिल हेमराज भळगट वय-65 धंदा शेती रा.सोनई ता.नेवासा जि.अ.नगर सत्यप्रतिज्ञेवर खरे सांगतो की, वर नमुद ॲफिडेव्हिट मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरे ाबर असुन त्याचे सत्यतेसाठी आजरोजी या लेखाखाली मी माझी सही केली असे.

**नेवासा**

**दिनांक:- 15 /07/2025** **ॲफिडेव्हिट करणार**

Solemnly affirmed before me
by Anil Hemraj Bhalgat
who is identified before me
by Adv N.S. Joshi
whom I personally know

Asstt Superintendent

age - 65 yrs OCC - Agri
R/o - Sonai Tal - Newasa
Dist - A. Nagar
ID - 937994507383